ePaper

| वर्ष - 8 | अंक - 12 | UDYAM-MH-26-0158827 |

महाईन्यूज ™

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

www.mahaenews.com | बुधवार, दिनांक 17 जुलै 2024 | पुणे आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews

# वायकर यांच्या खासदारकीला अमोल कीर्तिकरांचे आव्हान!






## मुख्यमंत्र्यांचे विठ्ठलाला साकडे

# शेतकऱ्यांच्या जीवनात सोन्याचे दिवस येऊ देत!

### मुख्यमंत्र्यांनी केली कुटुंबासमवेत श्री विठ्ठल रुक्मिणीची शासकीय महापूजा

। मुंबई । महाईन्यूज। प्रतिनिधी।

**लोकसभा निवडणुकीचा धुरळा बसला असून आता उत्सुकता ४ जूनला होणाऱ्या मतमोजणीची आहे. त्यातच लोकसभा निवडणुकीत तटस्थ राहणाऱ्या मनोज जरांगे यांनी विधानसभा निवडणुकीच्या रिंगणात उतरण्याची तयारी सुरु केली आहे. विधानसभा निवडणुकीसाठी सर्वच मतदारसंघातून 288 उमेदवार उभे करणार असल्याची घोषणा मनोज जरांगे यांनी केली आहे.**



> श्री विठ्ठलाची वारी हा आनंदाचा दिवस. सलग तिसऱ्यांदा मला देवाची पूजा करण्याचा मान मला मिळाला. हा पांडुरंगाचाच आशीर्वाद आहे. गेल्या वर्षापेक्षा वारकऱ्यांची संख्या 30 टक्क्यांहून अधिक वाढली असून राज्य सरकारने अनेक योजना नागरिकांना दिल्या आहेत. पांडुरंगाच्या आशीर्वादाने हे सरकार आपला कारभार करत आहे. **- एकनाथ शिंदे,** मुख्यमंत्री.

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी बुधवारी (ता. 17 जुलै) कुटुंबासमवेत श्री विठ्ठल रुक्मिणीची शासकीय महापूजा केली. यावेळी राज्यातील अनेक मंत्र्यांनी यावेळी उपस्थिती दर्शवली होती.

: बुधवारी (ता. 17 जुलै) आषाढी एकादशीनिमित्त पंढरपूरमध्ये मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि पत्नी यांच्या हस्ते श्री विठ्ठल रुक्मिणीची महापूजा पार पडली. यंदाच्या वर्षी नाशिक जिल्ह्यातील बाळू शंकर अहिरे आणि त्यांच्या पत्नी आशाबाई बाळू अहिरे यांना मानाचे वारकरी म्हणून शासकीय पूजेला बसण्याचा मान मिळाला होता. शासकीय महापूजा झाल्यानंतर मुख्यमंत्र्यांच्या हस्ते त्यांचा सत्कार करण्यात आला.

## क्रॉस व्होटिंग करणाऱ्या काँग्रेसच्या 7 आमदारांवर कारवाईचा बडगा

। मुंबई । महाईन्यूज। प्रतिनिधी।



विधानपरिषदेत क्रॉस व्होटिंग केल्याप्रकरणी काँग्रेसच्या ७ आमदारांवर कारवाईचा बडगा उगारण्यात येणार आहे. यासंदर्भात नाना पटोले यांनी दिल्लीत हायकमांडसोबत चर्चा देखील केली. दरम्यान या सर्व प्रकरणावर १९ तारखेच्या बैठकीत निर्णय घेण्यात येणार असल्याचं सतेज पाटलांनी म्हटलं आहे.

विधानपरिषदेत क्रॉस व्होटिंग करणाऱ्या आमदारांविरोधात काँग्रेस ॲक्शन मोडवर आली आहे. आमदारांवर लवकरात लवकर कारवाई करण्यात यावी यासाठी पटोलेंनी दिल्लीत हायकमांडसोबत चर्चा केलीये. दरम्यान बेईमानी करणाऱ्या आमदारांची नावं जनतेसमोर आणून त्यांच्यावर निलंबनाची कारवाई करण्याची मागणी अभिजीत वंजारींनी केली आहे. विधानपरिषदेच्या निवडणुकीत काँग्रेसकडून निवडणूक प्रतिनिधी म्हणून अभिजीत वंजारींची नियुक्ती करण्यात आली होती. दरम्यान काँग्रेसचे 7 आमदार कसे फुटले यासंदर्भात त्यांनी भाष्य केलं आहे. विधानपरिषदेच्या निवडणुकीत विजयाचा कोटा 23 मतांचा होता. काँग्रेसकडे एकूण मतं 37 होती. प्रज्ञा सातव यांच्यासाठी काँग्रेसकडून 30 मतांचा कोटा ठरवण्यात आला होता. मात्र प्रज्ञा सातवांना 25 मतं पडली. म्हणजेच काँग्रेसची इथे 5 मतं फुटली. तर काँग्रेसची 37 पैकी उर्वरित 7 मतं मिलिंद नार्वेकरांना देण्याचं ठरवलं होतं. मात्र, नार्वेकरांना ठाकरे गट, माकप आणि एक अपक्ष मिळून 17 आणि काँग्रेसची 5 मतं मिळून एकूण 22 मतं पडली. म्हणजेत काँग्रेसच्या 7 मतांपैकी नार्वेकरांना केवळ 5 मतं पडली आणि 2 मतं फुटली. ज्यांनी गद्दारी केली त्यांना सोडलं जाणार नसल्याचं विजय वडेट्टीवारांनी म्हटलं आहे. तर काँग्रेसमध्येच सर्वच क्रॉस व्होटिंग करणारे आहेत त्यामुळे कोणाकोणावर कारवाई करणार? असं म्हणत निरुपम यांनी काँग्रेसला टोला लगावला आहे.

## महापालिका शहरात लावणार 1 लाख बांबू

### आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांच्या हस्ते बांबू रोप लागवड कार्यक्रमाचा शुभारंभ

। पिंपरी-चिंचवड। महाईन्यूज । प्रतिनिधी।






**शहर** हरित करणे तसेच जैव कुंपण निर्मिती करीता महापालिकेच्या वतीने एक लाख बांबू लागवडीचा संकल्प करण्यात आला आहे. या बांबू रोप लागवड कार्यक्रमाचा शुभारंभ आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांच्या हस्ते बांबू रोपाची लागवड करून नुकताच करण्यात आला.

आम्ही भारताचे सुजाण नागरिक शपथ घेतो की, यावेळी उपस्थितांनी "आम्ही या भारत मातेला, या वसुंधरेला स्वच्छ व सुंदर ठेवण्यासाठी प्रयत्न करू, या वसुंधरेला या पर्यावरणाला आमच्यापासून कोणतीही हानी होणार नाही याची दक्षता घेऊ.आम्ही या देशाला सुजलाम सुफलाम करण्यासाठी कटीबध्द राहू व आमच्याकडून पर्यावरणाला त्रास होईल असे कोणतेही काम आम्ही करणार नाही, जास्तीत जास्त झाडे लावून या देशाला व वसुंधरेला स्वच्छ, सुंदर, हरित आणि प्रदुषणमुक्त करण्यासाठी आम्ही प्रयत्न करू" अशी शपथ घेतली. पिंपरी चिंचवड महापालिकेच्या उद्यान व वृक्षसंवर्धन विभागाच्या वतीने टेल्को रोड बर्ड व्हॅली चिंचवड येथे मानवेल जातीच्या बांबू रोपाची लागवड या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी अतिरिक्त आयुक्त प्रदिप जांभळे पाटील, उप आयुक्त रविकिरण घोडके, विशेष अधिकारी किरण गायकवाड, माजी नगरसदस्या अनुराधा गोरखे, कमल घोलप, जनता संपर्क अधिकारी प्रफुल्ल पुराणिक यांच्यासह महापालिकेचे अधिकारी कर्मचारी उपस्थीत होते.

### बांबू वृक्षाचे अनेक फायदे

बांबू वृक्ष मोठ्या प्रमाणात ऑक्सिजन निर्मिती करून देतात तसेच ते हवा शुद्ध करण्याचे कार्य देखील करतात. बांबू वृक्षांमुळे जमिनीची धूप होणे रोखले जाते आणि पर्यावरण संतुलन राखला जातो असे अनेक फायदे बांबू वृक्षाचे असल्याचे शेखर सिंह यांनी सांगितले.

# पूजा खेडकरांचं काउंटडाऊन सुरू!

## प्रशिक्षण कालावधीला ब्रेक, मसुरीला परत बोलावले

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**वादग्रस्त आयएएस प्रशिक्षणाथी अधिकारी पूजा खेडकरांच्या बाबतीत मोठी अपडेट समोर आली आहे. त्यांचा महाराष्ट्रातील प्रशिक्षण कालावधी संपवण्यात आला असून, मसुरीतील प्रशिक्षण संस्थेत परत बोलावण्यात आलं आहे.**



पूजा खेडकर यांचा जिल्हा प्रशिक्षण कार्यक्रम स्थगित करण्याचे आदेश महाराष्ट्र शासनाने दिले आहेत. लाल बहादूर शास्त्रीय प्रशासकीय अकादमी यांनी दिलेल्या निर्देशानुसार महाराष्ट्र शासनाने ही कारवाई केली. 23 जुलै पूर्वी मसूरी येथील अकॅडमीमध्ये पुन्हा हजर राहण्याचे आदेश दिले आहेत. खासगी गाडीवर लाल दिवा लावणे आणि स्वतंत्र केबिनसाठी आग्रह धरण यामुळे प्रोबेशनरी आयएस अधिकारी पूजा खेडकर चर्चेत आल्या होत्या. त्यानंतर खेडकर यांच्या शारीरिक अपंगत्व आणि ओबीसी प्रमाणपत्र बोगस असल्याचं समोर आलं. याच मुद्द्यांवर पंतप्रधान कार्यालय आणि मसूरी येथील लाल बहादूर शास्त्रीय प्रशासकीय अकादमीने पूजा खेडकर यांची चौकशी सुरू केली आहे. पूजा खेडकरांनी बनावट दिव्यांग प्रमाणपत्र वापरून परीक्षा उत्तीर्ण झाल्याचा आरोप त्यांच्यावर करण्यात येतोय. तसेच त्यांच्याकडे कोट्यवधींची संपत्ती असतानाही त्यांनी ओबीसी नॉन क्रिमी लेअर सर्टिफिकेट काढल्याचं समोर आलं.

### खेडकर यांची तीन तास चौकशी?

वाशिममध्ये पूजा खेडकर यांची तीन तास पोलीस चौकशी करण्यात आली असल्याची माहिती समोर आली आहे. या चौकशी दरम्यान अनेक गोष्टी घडल्या आहेत; मात्र त्या अद्यापही समोर आलेल्या नाहीत. वाशिम जिल्ह्यातील उपविभागीय पोलीस अधिकारी निलिमा आराज यांच्यासह दोन अधिकारी यांनी बंद खोलीत पूजा खेडकर यांची चौकशी केली. या चौकशीनंतर माध्यमांशी बोलण्यास पोलीस अधिकारी यांनी नकार दिला आहे. यामुळे पूजा खेडकर यांची नेमकी काय चौकशी झाली

आता या सर्व प्रकरणाची चौकशी केंद्र सरकार करणार आहे. केंद्र सरकारच्या कार्मिक मंत्रालयाने पूजा खेडकर प्रकरणाची चौकशी करण्यासाठी एकसदस्यीय समिती नेमली आहे. या समितीने आपला तपास सुरू केला असून दोन आठवड्यात त्याचा अहवाल मंत्रालयाला देण्यात येणार आहे. आपल्या चमकोगिरीमुळे चर्चेत आलेल्या पूजा खेडकरांच्याबद्दल रोज नवनव्या बातम्या समोर येत आहेत. प्रशिक्षणार्थी असतानाही स्वतःला स्वतंत्र केबिन आणि सरकारी गाडीची मागणी पूजा खेडकरांनी केली होती. त्यानंतर त्यांनी निवासी जिल्हाधिकाऱ्यांची केबिन बळकावून त्या ठिकाणी स्वतःचे फर्निचर ठेवले. तसेच स्वतःच्या खासगी ऑडीवर अंबर दिवा लावला. यामुळे पूजा खेडकर चांगल्याच चर्चेत आल्या.

# पंढरी नगरीत भक्तांची मांदियाळी

## 12 लाख भाविक; मुख्यमंत्र्यांच्या हस्ते शासकीय महापूजा

।पुणे ।महाईन्यूज । प्रतिनिधी।

**ज्या दिवसाची वाट गेले काही दिवस वारकरी बघत होते.तो सोनियाचा दिन आला आहे. दशमीला म्हणजे मंगळवारी पंढरी नगरीत भक्तांची मांदियाळी पहावयास मिळाली. यंदा विक्रमी भाविकांची गर्दी , टाळ मृदुंगाचा जयघोष, भजन, हरिनामाचा गजराने पंढरी नगरी दुमदुमून निघाली आहे. विठ्ठलाचे पदस्पर्श दर्शन घेण्यास भाविकांना २० ते २२ तास लागत आहे. यंदा अनेक सोयी सुविधा रांगेत असल्याने भाविकांनी समाधान व्यक्त केले.**



दरम्यान, उद्या म्हणजे बुधवारी आषाढी एकादशीचा मुख्य सोहळा एकादशी. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे विठ्ठलाची शासकीय महापूजा करणार आहेत.पंढरीचे सुख नाही त्रिभुवनी ...प्रत्यक्ष चक्रपाणी उभा असे... या अभंगा प्रमाणे लाखो भाविक पंढरीला आषाढी सोहळ्यासाठी दाखल झाले आहेत. एस टी, जादा रेल्वे तसेच खासगी वाहनातून भाविक मोठ्या संख्यने येत आहेत. त्याच बरोबरीने संतांच्या पालख्या सोबत देखील मोठ्या संख्येने भाविक आहेत. आषाढ दशमी म्हणजे मंगळवारी पंढरी नगरीत जवळपास १२ लाखाहून अधिक भाविक दाखल झाले आहेत. चंद्रभागा नदीच्या पैलतीरावरील ६५ एकर जागा भाविकांनी फुल्ल झाली आहे. शहरातील मठ, धर्मशाळा या ठिकाणी भाविक मुक्कामी आहेत. तसेच रस्त्याकडेला राहुट्या , तंबू टाकून भाविक भजन, कीर्तन, हरिनामाचा जयघोष कानी पडत आहे. शहरातील लॉज ,भक्त निवास

### पंढरी नगरी दुमदुमून निघाली

. दरम्यान, बुधवारी म्हणजे उद्या एकादशीची शासकीय महापूजा मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते होणार आहे.ज्या दिवसाची वाट गेले काही दिवस वारकरी बघत होते.तो सोनियाचा दिन आला आहे. दशमीला म्हणजे मंगळवारी पंढरी नगरीत भक्तांची मांदियाळी पहावयास मिळाली. यंदा विक्रमी भाविकांची गर्दी , टाळ मृदुंगाचा जयघोष, भजन, हरिनामाचा गजराने पंढरी नगरी दुमदुमून निघाली आहे.

हे देखील हाऊसफुल्ल झाले आहेत. मंदिर परिसर भाविकांच्या गर्दीने फुलून गेला आहे.चंद्रभागा नदी, वाळवंट भाविकांची गर्दी दिसून येत आहे. नदीचे स्नान,भटक पुंडलिक मंदिराचे दर्शन घेवून भाविक दर्शन रांगेत उभा आहे. मंदिर समितीने दर्शन रांगेतील भाविकांना पावसाचा त्रास होऊ नये म्हणून पत्रा-शेड उभे केले आहेत. या शिवाय आरोग्य , पिण्याचे पाणी ,नाष्टा दिला जात आहे. तसेच राज्य सरकारच्या वतीने पिण्याच्या पाण्याची बाटली मोफत वाटप केले जात आहे . दर्शन रांगेत भाविकांना देवाचे थेट दर्शन घेता यावे यासाठी विशेष व्यवस्था केल्याची माहिती मंदिर समितीचे सह अध्यक्ष गहिनीनाथ महारज औसेकर यांनी दिली आहे. चंद्रभागा नदीच्या पैलतीरावरील ६५ एकर जागेत भाविक मोठ्या संख्येने दाखल झाले आहेत. कोणताही अनुचीत प्रकार होऊ नये म्हणून पोलीस बंदोबस्त तसेच गर्दीच्या ठिकाणी “ माउली पथक “ पोलीस प्रशासनाने तैनात केले आहे. सोमवारी दुपारी चारच्या सुमारास रांगेत उभा होतो. मंगळवारी सकाळी ८ वाजता दर्शन दर्शन झाले. पावसाचा त्रास जाणवला नाही असे हिंगोली जिल्ह्यातील शशी चव्हाण या भाविकाने सांगितले. विठ्ठल मंदिराला आकर्षक विद्युत रोषणाई करण्यात आली आहे

## राष्ट्रवादी काँग्रेसचे शहराध्यक्ष

# अजित गव्हाणेंनी फुंकली ‘बंडाची तुतारी’!

## राहुल भोसले, पंकज भालेकर, यश साने यांचाही राजीनामा

### येत्या 20 तारखेला राष्ट्रवादी शरद पवार पक्षात प्रवेश करणार!

**। पिंपरी । प्रतिनिधी : महाईन्यूज**

**पिंपरी-चिंचवडमधील राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी अजित पवार गटाचे शहराध्यक्ष अजित गव्हाणे यांनी अखेर आपल्या पदाचा राजीनामा दिला. तसेच, त्यांचे समर्थक राहुल भोसले यांनी कार्याध्यक्षपदाचा, पंकज भालेकर यांनी विधानसभा प्रमुख पदाचा आणि यश साने यांनी विद्यार्थी सेल शहराध्यक्षपदाचा राजीनामा दिला आहे. त्यामुळे राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या वर्तुळात खळबळ**




येत्या २० जुलै रोजी राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष शरद पवार यांचा पिंपरी-चिंचवडमध्ये विजयी संकल्प मेळावा होणार आहे. त्यामध्ये अजित पवार गटाचे शहराध्यक्ष अजित गव्हाणे यांच्यासह ४० जण प्रवेश करतील, अशी चर्चा होती. मध्यंतरी गव्हाणे यांनी पवार साहेबांची भेटही घेतली होती.

लोकसभा निवडणुकीमध्ये राष्ट्रवादी शरद पवार गटाला मोठे यश मिळाले. एकूण १० पैकी ८ जागांवर पक्षाच्या उमेदवारांचा विजय झाला. तसेच, महाविकास आघाडीला महायुतीच्या तुलनेत घवघवीत यश मिळाल्यामुळे आगामी विधानसभा निवडणुकीच्या दृष्टीने अजित गव्हाणे यांनी ‘तुतारी’ हातात घेतली आहे, असा दावा केला जातो. महाविकास आघाडीकडून गव्हाणे यांचा दावा निश्चित झाल्यास, शिवसेना ठाकरे गटाकडून इच्छुक असलेले सुलभा उबाळे, धनंजय आल्हाट यांना उमेदवारीवर पाणी सोडावे लागण्याची शक्यता आहे.

पक्षाचे प्रदेशाध्यक्ष खासदार सुनील तटकरे यांच्याकडे गव्हाणे यांनी राजीनामा पाठवला आहे. तसेच, पंकज भालेकर, राहुल भोसले आणि यश साने यांनीही बंड केल्यामुळे पिंपरी-चिंचवडमध्ये अजित पवार गटाला मोठा धक्का मानला जात आहे.

> **राष्ट्रवादी शरद पवार पक्षाचा विजयी संकल्प मेळावा दि. २० जुलै रोजी होणार आहे. साहेबांच्या नेतृत्वावर विश्वास असलेले अनेकजण प्रवेश करतील. आगामी विधानसभा निवडणुकीत शहरातील तीनपैकी दोन मतदार संघामध्ये पक्षाकडून सक्षम उमेदवार आहेत. महाविकास आघाडीचे उमेदवार तीनही मतदार संघात विजय खेचून आणतील, असा आम्हाला विश्वास आहे.**
>
> **– तुषार कामठे,**
> **शहराध्यक्ष, राष्ट्रवादी शरद पवार पक्ष.**



### राष्ट्रवादीचा नवा शहराध्यक्ष योगेश बहल?

दरम्यान, अजित गव्हाणे पक्षाला रामराम ठोकणार हे निश्चित झाल्यानंतर आता अजित पवार शहरातील पक्षाची संघटनात्मक धुरा कोणाच्या खांद्यावर देणार? याकडे कार्यकर्त्यांचे लक्ष लागले होते. त्यामुळे स्थानिक नेते, गावकी-भावकी यांना शह देण्याची क्षमता असलेले माजी महापौर योगेश बहल यांना पुन्हा संघटनात्मक प्रमुख पदाची जबाबदारी सोपवण्यात येईल. तसेच, विधान परिषदेच्या राज्यपाल नियुक्त १२ जागांमध्ये राष्ट्रवादीला महायुतीमध्ये ३ जागा मिळतील. त्यामध्ये विधान परिषदेवर योगेश बहल यांना संधी देण्यात येईल, असे समजते. शहराध्यक्ष, नगरसेवक, महापौर, सत्तारुढ पक्षनेता, विरोधी पक्षनेता असा दीघ अनुभव असलेले योगेश बहल राष्ट्रवादीसाठी आता ‘संकटमोचक’ म्हणून पुढे येण्याची दाट शक्यता आहे.

---

## नवीन मालमत्ता धारकांनी कर भरणा करावा

### महापालिकेच्या कर संकलन विभागाचे आवाहन

**। पिंपरी-चिंचवड । प्रतिनिधी : महाईन्यूज**

**महापालिकेने नेमलेल्या स्थापत्य कन्सल्टंट प्रा. लि. कंपनीने नव्याने आढळलेल्या मिळकतींना कर आकारणी बिले बजावली आहेत. या बिलाबरोबर दिलेल्या स्कॅन कोडला तांत्रिक अडचण निर्माण झाली होती. ती आता दुर झाली आहे. त्यामुळे मालमत्ता धारकांनी कोड स्कॅन करून आपल्या मालमत्ता कराचा त्वरित भरणा करावा, असे आवाहन महापालिकेच्या कर संकलन व कर आकारणी विभागाच्या वतीने करण्यात आले आहे.**




पिंपरी-चिंचवड शहरात नवीन, वाढीव अशा मालमत्तांचा अत्याधुनिक ड्रोनच्या सहाय्याने सर्वेक्षण करण्यास सुरुवात झाली आहे. शहरात सुमारे दोन लाख नवीन आणि वाढीव मालमत्ता आढळण्याचा महापालिका प्रशासनाचा अंदाज आहे.

मालमत्ता सर्वेक्षणासाठी महापालिकेने स्थापत्य कन्सल्टंट प्रा. लि. कंपनीची नियुक्ती केली आहे. याच कंपनीच्या मार्फत नव्याने आढळलेल्या सुमारे साडेपाच हजार मिळकतींना कर आकारणी बिले बजावली आहेत. या बिलाबरोबर मालमत्ता धारकांना तत्काळ कर भरण्यासाठी स्कॅन कोड दिला आहे.

### तांत्रिक अडचण दूर

स्कॅन कोडला पाच ते सहा दिवसांपासून तांत्रिक अडचण निर्माण झाली होती. त्यामुळे मालमत्ता धारकांना बिले मिळाली असतानाही आपल्या कराचा भरणा करता येत नव्हता. आज (दि.16) मंगळवारपासून स्कॅन कोडची तांत्रिक अडचण दूर झाली आहे. त्यामुळे मालमत्ता धारकांनी बिलावरील कोड स्कॅन करून आपला मालमत्ता कराचा त्वरित भरणा करावा, असे आवाहन महापालिकेच्या कर संकलन व कर आकारणी विभागाचे सहायक आयुक्त नीलेश देशमुख यांनी केले आहे.

---

## आमदार लक्ष्मण जगताप पॅरामेडीकल कॉलेजच्या चार विद्यार्थीनींचा राज्यस्तरीय गौरव



**। पिंपरी-चिंचवड । प्रतिनिधी : महाईन्यूज**

मोरया सामाजिक प्रतिष्ठान संचलित लोकनेते आमदार लक्ष्मणभाऊ जगताप (Chinchwad )पॅरामेडीकल कॉलेजच्या ऋतुजा बाबर, प्राजक्ता पाटील, ज्योती म्हस्के, गायत्री जाधव या विद्यार्थीनींचा केंद्रीय मंत्री रामदास आठवले आणि कौशल्य विकास मंत्री मंगलप्रभात लोढा यांच्या हस्ते राज्यातील पॅरामेडीकल क्षेत्रातील उत्कृष्ट विद्यार्थी म्हणून गौरविण्यात आले. पॅरामेडीकलमधील पिंपरी-चिंचवडच्या एखाद्या विद्यार्थीनींना अशा प्रकारचा पहिल्यांदाच सन्मान प्राप्त झाल्याने तो शहराच्या मानात तुरा खोवला गेला आहे. जागतिक कौशल्य दिनानिमित्त महाराष्ट्र शासनाच्या कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित कार्यक्रमात लोकनेते आमदार लक्ष्मणभाऊ जगताप पॅरामेडीकल कॉलेजच्या विद्यार्थीनींचा मंत्री आठवले आणि लोढा यांच्या हस्ते गौरव करण्यात आला. या चारही विद्यार्थीनींना उत्कृष्ट विद्यार्थी म्हणून राज्य शासनाचे प्रमाणपत्र देण्यात आले. पॅरामेडीकलमधील पिंपरी-चिंचवडच्या विद्यार्थीनींना असा सन्मान पहिल्यांदाच प्राप्त झालेला आहे.

# शिक्षणाची नवी दिशा



## भूमिका

**कौशल्य विद्यापीठांची संकल्पना अलीकडच्या काळातली आहे. नुकतेच काही राज्यांनी यांची स्थापना केली आहे. आजघडीला महाराष्ट्रात तसेच हरियाणा, दिल्ली, गुजरात, राजस्थान, आसाम सारख्या राज्यात ही विद्यापीठे आहेत.**

'कौशल्य प्रशिक्षणा'तील सुसूत्रतेसाठी यापूर्वी २००८ ला स्थापन झालेल्या राष्ट्रीय कौशल विकास महामंडळाच्या (नॅशनल स्किल डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन – एनएसडीसी) प्रमाणपत्र व अनेक योजनांद्वारे मनुष्यबळ विकसित केले जात होते; त्यासाठी सेक्टर स्किल कौन्सिल्सचीही स्थापना करण्यात आली, त्यात विविध प्रकारच्या उद्योग क्षेत्रांतील मान्यवरांचा समावेश होता; परंतु प्रमाणपत्र-अभ्यासक्रमच सुरू होते आणि त्यातील काही दूरशिक्षणाद्वारे सुरू होते. याच्या पुढले पाऊल म्हणजे, कौशल्यावर आधारित पदवी व पदव्युत्तर पदवीची संकल्पना! ही संकल्पना 'कौशल्य विद्यापीठा'द्वारे राबवण्याचा उत्तम प्रयत्न केंद्र शासनाने केला आहे. अशा प्रकारच्या सर्व विद्यापीठांसाठी देशव्यापी एकरूप असा अभ्यासक्रम आराखडा (नॅशनल करिक्युलम फ्रेमवर्क) बनवला गेला असून कौशल्यावर आधारित व पारंपरिक विद्यापीठांद्वारे चालविल्या जाणाऱ्या अभ्यासक्रमांचे 'क्रेडिट फ्रेमवर्क' दिलेले आहे. 'राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२०'मध्येही कौशल्य



विकासावर भर देण्यात आलेला आहेच.'कौशल्य विद्यापीठां'तून दिल्या जाणाऱ्या शिक्षणापैकी ४० टक्केच वर्गखोल्यांतले शिक्षण असावे आणि उर्वरित ६० टक्के वाटा हा प्रत्यक्ष कौशल्य-शिक्षणावरच आधारित असावा, अशी संकल्पना आहे. महाराष्ट्र शासनाने स्थापित केलेले कौशल्य विद्यापीठ हे राज्यव्यापी विद्यापीठ असणे अपेक्षित आहे. अन्य राज्यांतही राज्य विधेयकांतून या विद्यापीठांची स्थापना झालेली आहे. यापैकी पहिल्या- हरियाणातील 'विश्वकर्मा कौशल्य विश्वविद्यालया'ची स्थापना सन २०१६ मध्ये झाली. त्यानंतर जवळपास सहा वर्षांनी (मागच्या वर्षी) इमारतीचे बांधकाम दुधोला पलवल येथे झाले. दि राजस्थान आयएलडी युनिव्हर्सिटी -२०१७ (दौलतपूर), मग २०२० मध्ये आसाम स्किल युनिव्हर्सिटी (प्रस्तावित आवार : मंगल्दाई, जिल्हा दारांग ) आणि दिल्ली स्किल्स युनिव्हर्सिटी, तर गुजरात स्किल युनिव्हर्सिटी (शिलाज, अहमदाबाद)ची स्थापना २०२१ मध्ये झाली आहे. 'महाराष्ट्र राज्य कौशल्य विद्यापीठा'ची स्थापना २०२२ ची आहे (विधेयक २०२१ मधले, प्रस्तावित ठिकाण : पनवेल-नवी मुंबई). अनेक इतर राज्यांनी कौशल्य विद्यापीठांची घोषणा केलेली आहे.दिल्ली स्किल्स युनिव्हसिटी'ने ब्राउन फील्ड पद्धतीने, दिल्लीत असलेल्या शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालयांतील डिप्लोमांचा समावेश विद्यापीठात करून घेतला. इथे तांत्रिक शिक्षणा बरोबरच इतर कौशल्यांवर आधारित अभ्यासक्रम देण्यात येत आहेत. असलेल्या मूलभूत सुविधांचा उपयोग करून या विद्यापीठांनी कार्याचा आरंभ केला आहे. राजस्थानच्या कौशल्य विद्यापीठाने महाविद्यालयांना संलग्नता दिली आहे. महाराष्ट्र राज्य कौशल्य विद्यापीठाने नवी मुंबई, पुणे व नागपूर येथे पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रम चालू केले आहेत. अभ्यासक्रम तयार करणे, प्रयोगशाळा, वर्ग खोल्या, प्राध्यापक नियुक्त्या, भौतिक सोयीसुविधा, परीक्षा विभाग, परीक्षा मंडळ, फी समिती, परिनियम, अभ्यास मंडळाची तसेच विद्यापरिषदेची स्थापना यांखेरीज कौशल्य विद्यापीठाला लागणारे उद्योग जगाशी निगडित 'ऑन द जॉब ट्रेनिंग' सुविहीतपणे होत राहील याची व्यवस्था व त्यासाठी नियामक मंडळाची स्थापना करणे हेही आवश्यक असते. अशा अनेक बाजू विठ्यापीठाच्या स्थापने पासून करणे आवश्यक होते. 'ग्रीनफिल्ड प्रोजेक्ट' असलेल्या महाराष्ट्र, आसाम, हरियाणा, गुजरात इथल्या कौशल्य विद्यापीठांचा प्रभाव किमान पाच वर्षांत -म्हणजे एक चार वर्षाची बॅच बाहेर पडल्यावर- सगळ्या पर्यंत पोहोचेल.महाराष्ट्र राज्य कौशल्य विद्यापीठात २१ अभ्यासक्रमांची निर्मिती करण्यात आली आहे. उद्योग समूहांशी ५५ करार केले असून सर्व अभ्यासक्रमांत हे उद्योग समूह विद्यार्थ्यांना 'ऑन द जॉब ट्रेनिंग' देणार आहेत. टाटा ट्रेंट, मॅकडोनाल्ड, मेट्रोपोलिस, केपीएमजी, पर्सिस्टन्ट सिस्टिम्स, वर्ल्ड ट्रेड सेन्टर यांसारख्या कंपन्यांचा /संस्थांचा समावेश आहे. कौशल्यावर आधारित अभ्यासक्रमात 'डिझाइन थिंकिंग'वर भर देण्यात आला आहे.

## प्रासंगिक »

### अमेरिकेच्या कानफटात

***अलोकशाही मार्गाचे समर्थन करणाऱ्यावर हल्ला झाला. राजकीय गणिते मांडली जाणार...***

अमेरिकेचे माजी... आणि आता कदाचित संभाव्य... अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्यावर प्रचार सभेत गोळ्या झाडल्या गेल्याने लोकशाहीची जननी नसलेली अमेरिका चांगलीच हादरलेली दिसते. असे होणे साहजिक. अध्यक्ष जो बायडेन यांनी या हल्ल्याचा तीव्र निषेध केला आणि अमेरिकी लोकशाहीत हिंसाचारास स्थान नाही, असे म्हटले. हे त्यांचे विधान वयपरत्वे होणाऱ्या विस्मरणाचे निदर्शक ठरते. याचे कारण अमेरिकी लोकशाहीच्या इतिहासावर रक्ताचे मुबलक शिंपण झालेले आहे. या देशाच्या चार अध्यक्षांचे प्राण हिंसाचारात गेलेले आहेत आणि डझनभर अध्यक्ष/ उपाध्यक्ष/ अध्यक्षपदाचे उमेदवार अशा हल्ल्यांत जायबंदी झालेले आहेत. ट्रम्प यांच्याच पक्षाचे अब्राहम लिंकन हे अशा हल्ल्यात मारले गेले आणि त्याच पक्षाचे रोनाल्ड रेगन जखमी झाले. रेगन हे चित्रपट कलाकार होते. अध्यक्षपदावर असताना त्यांच्यावर हल्ला झाल्याने साऱ्या जगाचे लक्ष त्यांच्याकडे गेले.

'शेतकऱ्यांना सक्षम करायचे आहे की कमकुवत?' हा रमेश पाध्ये यांचा लेख (लोकसत्ता विचारमंच- १२ जुलै) वाचला. हा लेख पटण्याजोगा नाही कारण त्यातील मांडणी वाचकांची दिशाभूल करणारी आहे. हा लेख प्रामुख्याने किमान आधारभूत किमती व त्यात झालेल्या 'अवास्तव' वाढीवर बेतलेला आहे.

# शेतकऱ्यांना कुबड्या नको, स्वातंत्र्य द्या!

आधारभूत किमतीच्या कुबड्या काढल्या तर शेतकरी सक्षम कसा होईल या बाबतीत मात्र ते काही बोलत नाहीत.मी शेतकरी संघटनेचा अध्यक्ष होतो, तसेच मोदी सरकारने २०२० साली पारित केलेल्या तीन कृषी कायद्यांना स्थगिती दिल्यानंतर, कायद्यामध्ये दुरुस्त्या करून शिफारशी करण्यासाठी, सर्वोच्च न्यायालयाने नेमलेल्या तीन सदस्यांच्या समितीत मी एक सदस्य होतो. शेतकरी संघटनेने किमान आधारभूत किमतीचे (एमएसपी) समर्थन कधीचे केलेले नाही तसेच एमएसपीचा कायदा व्हावा या मागणीला कडाडून विरोध केला आहे. इतकेच काय, शरद जोशींनी कृषी मूल्य आयोग बरखास्त करा अशी मागणी केलेली आहे.हरीतक्रांतीनंतर कृषीमूल्य आयोगाची स्थापन करण्यात आली मात्र किमान आधारभूत किंमत ठरवताना ती शेतीमालाच्या उत्पादन खर्चावर न ठरवता जागतिक बाजार, मागणी- पुरवठा स्थिती, राजकीय परिस्थिती, निवडणुका वगैरे लक्षात



घेऊन ठरवली जाते असे, असे ते म्हणतात व ते खरे आहे. याचा अर्थ ती उत्पादन खर्चावर आधारित नसे. पाध्ये यांच्या म्हणण्यानुसार १९८० मध्ये शरद जोशींनी सरकारवर दबाव टाकून आधारभूत किमती वाढवण्यास सुरुवात केली. शरद जोशींनी 'उत्पादन खर्चावर आधारित रास्त भाव' मागितला यात काय चूक झाली? त्याकाळी शेतकऱ्यांना येणारे अनेक खर्च हिशोबत धरले जात नसत किंवा अगदीच कमी धरले जात. शेणखताची बैलगाडी खर्चात धरताना ३/- रुपये प्रती गाडी व दूध उत्पादकांच्या उत्पन्नाच्या हिशोबत शेणखताची बैलगाडी ३०/- रुपयाला धरली जात असे. शेतकऱ्याला खते घेण्यासाठी प्रवास खर्च लागत नाही माल बाजारात न्यायला खर्च येत नाही हे कसे? त्या काळी तर फक्त तालुक्याच्या गावालाच खताची दुकाने असत व बाजार समित्या आज ही तालुक्याच्या गावीच आहेत. शेतकऱ्याच्या कुटुंबातील व्यक्ती शेतात कष्ट करतात त्याची मजुरी धरली जात नसे. वीजबिल तर आज ही धरले जात नाही हे हिशेबत धरायला नको? औद्योगिक वस्तूंची किंमत ठरवताना कारखानदार हे सगळे खर्च हिशोबात धरतोच ना? सीमांत शेतकऱ्याच्या शिवारात त्याच्या कुटुंबाला पुरेसे धान्य पिकत नाही, असे म्हटले आहे. सीमांत शेतकऱ्यांची व्याख्या म्हणजे पाच एकर ते अडीच एकर शेत जमिनीचा मालक अशी आहे. एखाद्या सीमांत शेतकऱ्याने पाच एकर गहू केला तर महाराष्ट्रात त्याला सरासरी ८० ते १०० क्विंटल गहू होतो. (पंजाबमध्ये याच्या दुप्पट होतो.) हा सीमांत शेतकरी काय १०० क्विंटल गहू घरी खाणार आहे का? त्याने कापूस, सोयाबीन, तुर, हरभरा केला तर एकरी किमान १० क्विंटल उत्पादन येते. हे सर्व तो घरी खातो का?

## ।। अभंगवाणी ।।



आजिवरी तुम्हां आम्हां नेणपण ।
कौतुकें खेळणें संग होता ॥१॥

आतां अनावर जालें अगुणाची ।
करूं नये तें चि करीं सुखें ॥२॥

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे- पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे- 411018 येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव । मुख्य कार्यकारी संपादक : सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) विशेष सूचना: हा अंक कोणत्याची प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

# कधी गडावर गेलात का? निधी दिलाय का?

## संभाजीराजेंचा मुश्रीफांवर पलटवार; पाटलांनाही प्रत्युत्तर

। नवी दिल्ली ।

वृत्तसंस्था : महाईन्यूज

**विशाळगडावरील अतिक्रमण सरकारने हटवावं ही मागणी घेऊन माजी खासदार संभाजीराजे छत्रपती यांनी आंदोलन सुरू केलं आहे. मात्र या आंदोलनामुळे कोल्हापूरचे पालकमंत्री हसन मुश्रीफ आणि माजी पालकमंत्री सतेज पाटील यांनी संभाजीराजेंवर टीका केली आहे. "किल्ल्यावरील अतिक्रमणाच्या मुद्द्याबाबत संभाजीराजे यांची भूमिका योग्य आहे का हे त्यांनाच विचारा", अशी टीका मुश्रीफ यांनी केली होती. "राजर्षी शाहू महाराजांच्या पुरोगामी जिल्ह्याला हे कृत्य शोभणारे नाही", असंही मुश्रीफ म्हणाले होते. त्यावर संभाजीराजे यांनी "मुश्रीफांनी मला मला पुरोगामीत्व शिकवू नये", असे प्रत्युत्तर दिलं होतं.**



दरम्यान, आपल्या आंदोलनाला यश आल्यानंतर संभाजीराजे यांनी आज (१६ जुलै) कोल्हापुरात प्रसारमाध्यमांशी बातचीत केली. यावेळी त्यांनी मुश्रीफ आणि सतेज पाटलांच्या टीकेला प्रत्युत्तर दिलं.संभाजीराजे म्हणाले, "विशाळगडावर दोन-दोन तीन-तीन मजली अतिक्रमणं झाली होती. किल्ल्यावर अनेक शिवकालीन विहिरी आहेत. परंतु, काही लोकांनी त्या विहिरींवर जाळी टाकून, त्यावर सिमेंट-काँक्रीटचा ओटा बनवून त्यावर अतिक्रमणं केली होती. घरं, इमारती बांधल्या होत्या. आम्ही हे खपवून घेणार नाही."माजी खासदार म्हणाले, "काही नेते मंडळी खाली (गडाच्या पायथ्याशी) उभे राहून बोलतात. मला त्या लोकांना विचारायचं आहे की तुम्ही कधी गडावर गेलाय का? माझं या लोकांना आव्हान आहे, त्यांनी सांगावं, ते कधी गडावर गेले आहेत का? कोल्हापूरचे पालकमंत्री हसन मुश्रीफ आणि माजी पालकमंत्री सतेज पाटील हे मला सांगतात की मी असं बोलू नये. संभाजीराजेंनी पुरोगामीत्व सोडलंय वगैरे गप्पा मारतात. परंतु, मला यांना विचारायचं आहे की तुम्ही कधी किल्ल्यावर गेला आहात का? तुमचा मला बोलण्याचा काय अधिकार आहे? तुम्ही किल्ल्यावर जा, काम करा आणि मग बोला."संभाजी राजे म्हणाले, माझ्यावर टीका करणाऱ्या लोकांना मला विचारायचं आहे तुम्ही आतापर्यंत किल्ल्यांसाठी काय कामं केली आहेत? मला मुश्रीफांना विचारायचं आहे की तुम्ही कधी विशाळगडासाठी निधी दिला आहे का? कोल्हापूरच्या बाहेर असलेल्या किल्ल्यांचं सोडा, किमान कोल्हापुरातील किल्ल्यांसाठी काही पैसे दिले आहेत का? मी ठामपणे सांगू शकतो, मी विशाळगडासाठी काम केलं आहे. कोल्हापुरातील इतर किल्ल्यांसाठी देखील कामं केली आहेत. पुरातत्व विभागाच्या माध्यमातून मी विशाळगडाला पाच कोटी रुपये मिळवून दिले होते. रामगडावर महाराणी ताराबाई यांचा वास्तव्य होतं, त्या किल्ल्यासाठी देखील मी पाच कोटी रुपये दिले होते. मला या लोकांना विचारायचं आहे की तुम्ही किल्ल्यांसाठी काय केलंय? तुम्ही किल्ल्यांना काही दिलंय का? मुळात माझ्यावर बोलण्यासाठी तुमच्याकडे अधिकार असायला हवा. एक माणूस किल्ल्यांसाठी काम करत असेल तर तुम्ही त्याला बदनाम करताय, हे योग्य नाही.दरम्यान, आपल्या आंदोलनाला यश आल्यानंतर संभाजीराजे यांनी आज (१६ जुलै) कोल्हापुरात प्रसारमाध्यमांशी बातचीत केली. यावेळी त्यांनी मुश्रीफ आणि सतेज पाटलांच्या टीकेला प्रत्युत्तर दिलं.संभाजीराजे म्हणाले, "विशाळगडावर दोन-दोन तीन-तीन मजली अतिक्रमणं झाली होती. किल्ल्यावर अनेक शिवकालीन विहिरी आहेत. परंतु, काही लोकांनी त्या विहिरींवर जाळी टाकून, त्यावर सिमेंट-काँक्रीटचा ओटा बनवूनकेली होती. घरं, इमारती बांधल्या होत्या. आम्ही हे खपवून घेणार नाही."माजी खासदार म्हणाले, "काही नेते मंडळी खाली (गडाच्या पायथ्याशी) उभे राहून बोलतात. मला त्या लोकांना विचारायचं आहे की तुम्ही कधी गडावर गेलाय का? माझं या लोकांना आव्हान आहे, त्यांनी सांगावं, ते कधी गडावर गेले आहेत का? कोल्हापूरचे पालकमंत्री हसन मुश्रीफ आणि माजी पालकमंत्री सतेज पाटील हे मला सांगतात की मी असं बोलू नये.

### मला बोलण्याचा काय अधिकार

संभाजीराजेंनी पुरोगामीत्व सोडलंय वगैरे गप्पा मारतात. परंतु, मला यांना विचारायचं आहे की तुम्ही कधी किल्ल्यावर गेला आहात का? तुमचा मला बोलण्याचा काय अधिकार आहे? तुम्ही किल्ल्यावर जा, काम करा आणि मग बोला."संभाजी राजे म्हणाले, माझ्यावर टीका करणाऱ्या लोकांना मला विचारायचं आहे तुम्ही आतापर्यंत किल्ल्यांसाठी काय कामं केली आहेत? मला मुश्रीफांना विचारायचं आहे की तुम्ही कधी विशाळगडासाठी निधी दिला आहे का?

---

# अजित पवारांचं राजकारण पुन्हा स्थापन करू

## प्रकाश आंबेडकरांची साद; म्हणाले, "राष्ट्रवादी आमचा वापर करतेय"

। नवी दिल्ली ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**महायुतीत अजित पवार (राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी) यांना एकटं पाडण्याचा प्रयत्न होत आहे, त्यांना त्रास देण्याचा प्रयत्न केला जात आहे, त्यामुळे आगामी काळात आमचा पक्ष वेगळा विचार करू शकतो", असं वक्तव्य राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या अजित पवार गटातील विधान परिषदेचे आमदार अमोल मिटकरी यांनी अलीकडेच केलं होतं.**



त्याचबरोबर, "भविष्यात अजित पवार आणि प्रकाश आंबेडकर यांना एकत्र आणण्यासाठी एक कार्यकर्ता म्हणून मी प्रयत्न करेन", असंही मिटकरी म्हणाले होते. पवार व आंबेडकर हे दोन नेते एकत्र आले तर राज्याच्या राजकारणाची दिशा आणि दशा बदलू शकते", असंही मिटकरी म्हणाले होते.अमोल मिटकरींच्या या वक्तव्यामुळे राज्याच्या राजकारणात तिसऱ्या आघाडीची चर्चा सुरू झाली होती. मात्र वंचित बहुजन आघाडीचे प्रमुख प्रकाश आंबेडकर यांनी या सर्व चर्चांना पूर्णविराम दिला आहे. वंचित आणि राष्ट्रवादीमध्ये कोणत्याही प्रकारची चर्चा चालू नसून हे दोन पक्ष सध्या तरी एकत्र येणार नसल्याचं प्रकाश आंबेडकर यांनी स्पष्ट केलं आहे. तसेच ते म्हणाले, "राष्ट्रवादीचे नेते केवळ महायुतीत त्यांचा फायदा व्हावा म्हणून वंचितचा वापर करू पाहतायत."प्रकाश आंबेडकर म्हणाले, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी आणि वंचित बहुजन आघाडीमध्ये कोणत्याही प्रकारची चर्चा झालेली नाही किंवा दोन पक्षांची आघाडी होण्याबाबत चर्चा चालू नाही. मला असं वाटतंय की अजित पवारांची राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी आमचा वापर करू पाहतेय.'आम्ही चाललो वंचितकडे, आम्हाला थांबवायचं असेल तर आमच्या विधानसभेच्या जागा वाढवा' अशा पद्धतीने ते महायुतीशी चर्चा करत असावेत, असं मला वाटतंय. अजित पवारांचा पक्ष विधानसभेला महायुतीत जास्तीत जास्त जागा मिळवण्यासाठी आमचा (वंचित बहुजन आघाडीचा) शिडी म्हणून वापर करू पाहतेय असं सध्या तरी दिसतंय.दरम्यान, प्रकाश आंबेडकर यांनी अजित पवार यांचं राजकारण पुन्हा स्थापन करू शकतो असा दावा केला आहे. आंबेडकर म्हणाले, मी अजित पवारांना म्हटलंय की त्यांनी महायुतीमधून बाहेर पडावं, आमच्याबरोबर यावं, आम्ही त्यांचं राजकारण पुन्हा होतं तसं स्थापन करून देऊ.

### राजकारण पुन्हा स्थापन करू

आमदार अमोल मिटकरी म्हणाले होते, "मी या दोन मोठ्या नेत्यांना एकत्र आणण्याइतका मोठा नाही. या गोष्टी वरिष्ठ पातळीवर होतात. परंतु, एक दुवा म्हणून काम करण्यास हरकत नाही. मला माझ्या पक्षाने सांगितलं तर मी अनेकदा प्रकाश आंबेडकर यांच्या घरी जाऊ शकतो. आमच्या भूमिका त्यांच्यापुढे मांडू शकतो. मी प्रकाश आंबेडकरांकडे केवळ वंचित बहुजन आघाडीचे सर्वेसर्वा म्हणून पाहत नाही. तर ते बाबासाहेब आंबेडकरांचं रक्त आहे आणि मी त्यांच्याचरणी नेहमीच नतमस्तक होत असतो. मी अधून-मधून त्यांना भेटत असतो.

# मेहबुबा मुफ्तींचा सरकारवर संताप

## रक्षणासाठी जवान येतात अन् शवपेटीतून परत जातात

। नवी दिल्ली ।

वृत्तसंस्था : महाईन्यूज

**जम्मू काश्मीरच्या डोडा भागात भारतीय लष्कर व दहशतवाद्यांमध्ये झालेल्या चकमकीत चार जवान शहीद झाले आहेत. या घटनेवरून जम्मू-काश्मीरच्या माजी मुख्यमंत्री मेहबुबा मुफ्ती यांनी मोदी सरकारच्या कारभारावर प्रश्न उपस्थित केले आहेत. प्रसारमाध्यमांशी बोलताना त्या म्हणाल्या, “देशाच्या सीमा सुरक्षित ठेवण्यासाठी जवान काश्मीरमध्ये येतात, मात्र इथून परत जातं ते त्यांचं पार्थिव... तेही शवपेटीतून... मोदी सरकार म्हणतंय की काश्मीर खोऱ्यातला दहशतवाद संपलाय, मग काश्मीरमध्ये आपल्या जवानांना कोण मारतंय? या सर्व घटनांना कोण जबाबदार आहे? जम्मूत सध्या जे काही घडतंय त्याची जबाबदारी हे सरकार घेणार आहे का?”**






मेहबुबा मुफ्ती म्हणाल्या, “जम्मूत सध्या काय घडतंय? तिथलं वातावरण कोणामुळे बिघडलंय? तिथे मोठ्या प्रमाणात हत्या होत आहेत, आपले जवान मारले जात आहेत. गृहमंत्र्यांनी (अमित शाह) या घटनांची जबाबदारी घ्यावी. गेल्या अनेक महिन्यांपासून हे सगळं घडतंय, मात्र गृह मंत्रालयाने याबाबत चकार शब्द उच्चारलेला नाही. गेल्या ३२ महिन्यांमध्ये जम्मू-काश्मीर अशांत आहे. प्रामुख्याने नव्या पोलीस महासंचालकांची नियुक्ती झाल्यापासून इथलं वातावरण दूषित झालं आहे.”जम्मू-काश्मीरच्या माजी मुख्यमंत्री म्हणाल्या,“सीमेवर आपले काश्मिरी बांधव नाहीत, मुसलमानही नाहीत, पत्रकार व व्यापारी देखील नाहीत. तुम्हीच (केंद्र सरकार व भारतीय लष्कर) देशाच्या सीमा सुरक्षित करता. मग देशात होणारी घुसखोरी रोखण्याची जबाबदारी कोणाची आहे? ही स्थानिक सुरक्षा बलाची जबाबदारी नाही. तुम्ही तुम्हाला वाट्टेल तसा अपप्रचार करत आहात, गेल्या सहा वर्षांपासून तुम्ही काश्मीरमध्ये अपप्रचार केलात, त्यातून काय साध्य केलंत? आता तुम्हाला उत्तर काश्मीरमध्ये मोठा धक्का बसला आहे.”पीडीपी प्रमुख म्हणाल्या, “काश्मीरवर होत असलेल्या दहशतवादी हल्ल्यांची सरकारने जबाबदारी घेतलेली नाही. त्यांनी योग्य वेळी येथील पोलीस महासंचालकांना बडतर्फ करायल हवं होतं. गेल्या ३२ महिन्यांत काश्मीर खोऱ्यात आपण आपले ५० हून अधिक जवान गमावले आहेत. परंतु, हे सरकार त्या जवानांची देखील जबाबदारी घेत नाही. सध्याचे पोलीस महासंचालक केवळ राजकीयदृष्ट्या निर्णय घेत आहेत. ते पीडीपी पक्ष फोडण्याचा प्रयत्न करत आहेत. तसेच ते स्थानिक नागरिकांना, पत्रकारांना त्रास देत आहेत, धमक्या देत आहेत. तसेच ते मौलवींना ब्लॅकमेल करत आहेत.”मेहबुबा मुफ्ती म्हणाल्या, “जम्मूत सध्या काय घडतंय? तिथलं वातावरण कोणामुळे बिघडलंय? तिथे मोठ्या प्रमाणात हत्या होत आहेत, आपले जवान मारले जात आहेत. गृहमंत्र्यांनी (अमित शाह) या घटनांची जबाबदारी घ्यावी. गेल्या अनेक महिन्यांपासून हे सगळं घडतंय, मात्र गृह मंत्रालयाने याबाबत चकार शब्द उच्चारलेला नाही. गेल्या ३२ महिन्यांमध्ये जम्मू-काश्मीर अशांत आहे. प्रामुख्याने नव्या पोलीस महासंचालकांची नियुक्ती झाल्यापासून इथलं वातावरण दूषित झालं आहे.”जम्मू-काश्मीरच्या माजी मुख्यमंत्री म्हणाल्या, “सीमेवर आपले काश्मिरी बांधव नाहीत, मुसलमानही नाहीत, पत्रकार व व्यापारी देखील नाहीत. तुम्हीच (केंद्र सरकार व भारतीय लष्कर) देशाच्या सीमा सुरक्षित करता. मग देशात होणारी घुसखोरी रोखण्याची जबाबदारी कोणाची आहे? ही स्थानिक सुरक्षा बलाची जबाबदारी नाही. तुम्ही तुम्हाला वाट्टेल तसा अपप्रचार करत आहात, गेल्या सहा वर्षांपासून तुम्ही काश्मीरमध्ये अपप्रचार केलात, त्यातून काय साध्य केलंत? आता तुम्हाला उत्तर काश्मीरमध्ये मोठा धक्का बसला आहे.”पीडीपी प्रमुख म्हणाल्या, “काश्मीरवर होत असलेल्या दहशतवादी हल्ल्यांची सरकारने जबाबदारी घेतलेली नाही.

### मोदी सरकारच्या कारभारावर प्रश्न

त्यांनी योग्य वेळी येथील पोलीस महासंचालकांना बडतर्फ करायल हवं होतं. गेल्या ३२ महिन्यांत काश्मीर खोऱ्यात आपण आपले ५० हून अधिक जवान गमावले आहेत. परंतु, हे सरकार त्या जवानांची देखील जबाबदारी घेत नाही. सध्याचे पोलीस महासंचालक केवळ राजकीयदृष्ट्या निर्णय घेत आहेत. ते पीडीपी पक्ष फोडण्याचा प्रयत्न करत आहेत. तसेच ते स्थानिक नागरिकांना, पत्रकारांना त्रास देत आहेत, धमक्या देत आहेत. तसेच ते मौलवींना ब्लॅकमेल करत आहेत.”जम्मू काश्मीरच्या डोडा भागात भारतीय लष्कर व दहशतवाद्यांमध्ये झालेल्या चकमकीत चार जवान शहीद झाले आहेत. या घटनेवरून जम्मू-काश्मीरच्या माजी मुख्यमंत्री मेहबुबा मुफ्ती यांनी मोदी सरकारच्या कारभारावर प्रश्न उपस्थित केले.

# विद्यार्थ्यांसाठीही विद्यावेतन योजनेची घोषणा

## तरुणांना 10 हजार रुपये स्टायपंड देण्याची घोषणा

। नवी दिल्ली ।

वृत्तसंस्था : महाईन्यूज

**मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आषाढी एकादशीनिमित्त उद्या (१७ जुलै) पहाटे पंढरपूरच्या विठुरायाची शासकीय पूजा करणार आहेत. या पूजेसाठी ते आज संध्याकाळीच पंढरपुरात दाखल झाले. दरम्यान, संध्याकाळी त्यांनी पंढरपुरात आयोजित ‘कृषी पंढरी’ या कृषी प्रदर्शनाचं उद्घाटन केलं.**



दरम्यान, शिंदे यांनी पंढरपुरातून लाडकी बहीण या योजनेनंतर विद्यार्थ्यांसाठीही खास योजनेची घोषणा केली. मुख्यमंत्र्यांनी या योजनेंतर्गत १२ वी उत्तीर्ण विद्यार्थ्यांना दरमहा सहा हजार रुपये, डिप्लोमा केलेल्या विद्यार्थ्यांना आठ हजार रुपये आणि पदवीधर तरुणांना १० हजार रुपये स्टायपंड देण्याची घोषणा केली.आषाढी एकादशीच्या शासकीय महापूजेसाठी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे पंढरपूरमध्ये दाखल झाले आहेत. दरम्यान, यावेळी त्यांनी पंढरपूर कृषी उत्पन्न बाजार समितीच्या वतीने आयोजित केलेल्या कर्मयोगी सुधाकर पंत परिचारक कृषी पंढरी महोत्सवाचं उद्घाटन केलं. मुख्यमंत्र्यांबरोबर यावेळी सोलापूरचे पालकमंत्री चंद्रकांत पाटील, महसूलमंत्री राधाकृष्ण विखे पाटील उपस्थित होते. या कार्यक्रमात बोलताना शिंदे यांनी तरुणांसाठीच्या योजनेची घोषणा केली.एकनाथ शिंदे म्हणाले, “राज्यात शेतकऱ्यांचं, कष्टकऱ्यांचं, वारकऱ्यांचं, कामगारांचं सरकार आहे. हे सरकार सर्वांचं भलं कसं होईल ते पाहतंय. आपल्या सरकारने महिलांसाठी मुख्यमंत्री लाडकी बहीण योजना आणली.

### लाडक्या भावांकडेही आमचं लक्ष आहे

या योजनेअंतर्गत राज्यातील महिलांना दर महिन्याला १,५०० रुपये, म्हणजेच वर्षाला १८,००० रुपये दिले जातील. तसेच त्यांना दर वर्षी तीन गॅस सिलेंडर दिले जातील. या योजनेचे पैसे लवकरच महिलांच्या खात्यात वळवले जातील.”मुख्यमंत्री म्हणाले, “आपण लाडकी बहीण योजना आणली तेव्हा काही लोकांनी आपल्यावर टीका केली. ते म्हणाले, लाडक्या बहिणीसाठी योजना आणलीत, आता लाडक्या भावांचं काय? मला त्यांना सांगायचं आहे की लाडक्या भावांकडेही आमचं लक्ष आहे. त्यामुळे आम्ही त्यांच्यासाठीही योजना आणली आहे.

# ते तीर्थांचे माहेर

वारी हा अध्यात्मिक सुखाचा प्रवाह आहे. वारी हे एक व्रत आहे. संस्कार आहे. अट्टहासाने जोडलेला सदगुण आहे. एकात्मतेची गंगोत्री आहे. वारी हा भगवतभक्तीचा नुसता अविष्कार असून मुक्तीतील आत्मनंदाचा आणि भक्तीतील प्रेमसुखाचा अनुभव आहे. कारण वारकरी हा भागवत संप्रदाय आहे.







पावसाळा सुरु झाला की आषाढात पालख्यांचे वेध लागतात. आषाढातली ही एकादशी आणि तिची वारी हे वारकऱ्याचं व्रत आहे. संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर महाराज व संत तुकाराम महाराज यांचा पालखी सोहळा हा महाराष्ट्राच्या सांस्कृतिक व धार्मिक लोकजीवनाचे वैभव आहे. ज्ञानेश्वर, तुकाराम महाराजांच्या पादूका मिरवत या दिंड्या कैवल्याच्या पुतळ्याला भेटायला येतात.आषाढी-कार्तिकीला ‘पंढरपुरा नेईन गुढी’ म्हणत. सर्व महाराष्ट्रातून दिंडया येतात. अगदी कर्नाटकातून, गोव्यातूनही दिंडया येतात. नदी अनंत अडचणी आल्या तरी सर्वांना जीवन देत पुढे सागराशी एकरूप होण्यास आतुर झालेली असते तशीच ही विठ्ठल भकत्तीची गंगा, चंद्रभागेच्या काठाशी असणाऱ्या पंढरीच्या विठ्ठलाशी एकरूप होते ती वारकरी सोहळ्याच्या रूपात. वारी हा अध्यात्मिक सुखाचा प्रवाह आहे. वारी हे एक व्रत आहे. संस्कार आहे. अट्टहासाने जोडलेला सदगुण आहे. एकात्मतेची गंगोत्री आहे. वारी हा भगवतभक्तीचा नुसता अविष्कार असून मुक्तीतील आत्मनंदाचा आणि भक्तीतील प्रेमसुखाचा अनुभव आहे. कारण वारकरी हा भागवत संप्रदाय आहे. या संप्रदायाची शिकवण अगदी साधी-सोपी आहे. प्रत्येकाने आपला व्यवसाय करावा, स्वधर्माचे पालन करावे पण हे करतांना पांडूरंगाचे स्मरण करावे हीच भक्ती. त्यात कोणी उच्च नीच नव्हते, कोण्या एका जातीचे संत नाहीत. संतकवी कोण्या एका गावाचे नाही घराण्याचेही नाहीत. सेना-न्हावी, सावता ‘माळी’, नामा ‘शिंपी’, गोरा ‘कुंभार, नरहरी ‘सोनार’ कान्होपागा ‘वारांगना’, एकनाथ ‘ब्राह्मण’, तर चोखा ‘महार’! अशी एकात्मतेती शिकवण. विठ्ठलाच्या गावा जावे! विठ्ठलरूप व्हावे हेच सत्य. विठ्ठलाला माऊली मानणाऱ्या या संताच्या मनात विठ्ठल ही प्रेम-वात्सल्याची मुर्ती आहे. सासुरवाशीण मुलगी माहेराला जाते. प्रतिवर्षी या प्रेमसुखाच्या माहेराला जाण्यसाठी सकल संताची मांदियाळी वैष्णवांसह पंढरपुरी जायला निघते. जागोजाग मुक्काम करीत पायी पंढरपुरास पोहचते. एका अर्थी ही संत साहित्य संमेलने होतात. चर्चा होतात. अनुभवी, अभ्यासू वारकऱ्यांची कीर्तने होतात. त्यातून टाळकऱ्यांचे सहज शिक्षण होते. वारीची ही वाट संतानी दाखविली. आणि याच मार्गावरून वाटचाल करीत जीवनालाच सदाचारी बनविले. हा मार्ग अनुभवसिद्ध आहे. अहो! एखादी सहल काढायची तर किती तयारी, विचार करावा लागतो जेवढी

साक्षात पांडुरंग त्यांच्यासाठी वाट पाहत असतो. त्या प्राणप्रिय विठुरायाच्या भेटीला जाण्यासाठी वारकरीही तळमळत असतात. आपल्या गावापासून निघालेल्या प्रत्येक दिंडीमध्ये वारकरी समाविष्ट झालेला आहे. चालताना पायाच्या वेदना त्याला कधी आठवत नाहीत. घरची आठवण येत नाही. प्रामुख्याने शेतकरी असलेला हा वारकरी शेतामध्ये पेरलेलं पीक कसे आहे, याचीही त्याला काळजी नाही. तो सर्व भार त्या पांडुरंगावर टाकून प्राणसख्या पांडुरंगाला भेटण्यासाठी अतिशय उत्साहाने निघालेला आहे माउली, ज्ञानराज माउली, ज्ञानोबा तुकाराम, पांडुरंग हरी वासुदेव हरी, गण गण गणात बोते हे सर्व त्याचे शक्तीचे मंत्र आहेत.

प्रत्येक पावलागणीक तो हा मंत्र म्हणत असतो आणि पुढे चालत असतो. शास्त्रकार असे सांगतात, मुखामध्ये रामाचं नाम असेल आणि तुम्ही पायी वारी करत असाल तर तुमच्या पावलागणीक यज्ञ केल्याचे पुण्य तुम्हाला लाभते. तो पुण्याचा ठेवा सोबत घेऊन तो पुढचे मार्गक्रमण करीत असतो. कारण त्याला विठ्ठलाने सांगितलेले आहे. वर्षभरामध्ये आपल्या संसारामध्ये कार्यरत असणारा हा वारकरी वर्षाच्या या आषाढी व कार्तिकी एकादशीला विठ्ठलाला भेटायला जाण्यासाठी पंढरीची वारी करतो. आपल्या मायबाप विठ्ठलाला भेटण्यासाठी अतिशय आतूर होत असतो. आपलं

क्षेमकुशल त्याला सांगावं, आपला संसार त्याच्या पायावर ठेवावा, असा भाव त्यांच्या मनामध्ये असल्यामुळे त्याला आपल्या जीवनाची धन्यता आषाढी कार्तिकी वारीमध्ये वाटते. खरं म्हणजे वारी हा एक अध्यात्म उत्सव सोहळा आहे. खूप मोठी सामाजिक व आध्यात्मिक चळवळ होत आहे. अवघ्या महाराष्ट्रातील संत मांदियाळी यांच्या दिंड्या पंढरीच्या वाटेने निघालेल्या आहेतबुधवार, 17 जुलैला हा आषाढी एकादशी सोहळा पंढरपुरामध्ये भक्तांना सोबत घेऊन साजरा होणार आहे. हे जरी सत्य असले, तरी प्रत्येक वारकरी जो आपल्या कामाच्या व्यापामुळे, आपल्या संसारातील तापत्रयामध्ये गुंतला असल्याने पंढरपूरला जाऊ शकत नाही.

**पंढरीची वारी आहे माझे घरी ।**

## 'वारी' कधी आणि कशी सुरु झाली संपूर्ण माहिती

पंढरीची वारी म्हणजे महाराष्ट्रात साजरी होणारा एक मोठा सणच. हा सण म्हणजे फक्त हरिनामाचा गजर आणि निस्सीम भक्ती. आषाढाची चाहूल लागताच मनाला ओढ लागते ती पंढरीच्या वारीची. हरिमय झालेले असंख्य वारकरी कित्येक किलोमीटरचा रस्ता तुडवत त्या पांडुरंग परमात्म्याला पाहण्यासाठी जातात, आणि हा अनुपम सोहळा उभा महाराष्ट्र तल्लीन होऊन पाहत असतो.प्रस्थान सोहळे पार पाडत ‘ग्यानबा तुकाराम’ गजर करत पालख्या आता पंढरपूरच्या दिशेने निघाल्या आहेत. हा पंढरीचा पांडुरंग म्हणजे अवघ्या महाराष्ट्राचे आराध्य दैवत. ही पंढरीची वारी हजारो वर्ष अविरत सुरू आहेआणि ती पुढेही राहील पण वारी म्हणजे काय? त्याचं महत्व काय? उद्दिष्ट काय? याविषयी क्वचितच माहिती असते. हाच हरिमय इतिहास, वारीची दिव्य परांपरा आज आपण अगदी सोप्या आणि सध्या शब्दात उलगडणार आहोत.

### पंढरीची वारी माहिती

‘वारी म्हणजे वारकरी विठ्ठलाच्या भेटीसाठी पंढरपूरला पायी चालत जातात आणि जो वारकऱ्यांचा समूह मिळून वारीला जातो त्याला दिंडी या नावाने ओळखले जाते. या वारीमध्ये लोक पंढरपूर पर्यंत चालत जात असताना विठ्ठलाची भक्ती गीते, नृत्य आणि टाळ नाद यासारख्या गोष्टी केल्या जातात आणि वारीचा आनंद घेतला जातो. वारी म्हणजे महाराष्ट्रातील विविध गावांपासून सुरू होऊन पंढरपूर येथे संपणारी सामुदायिक एक पदयात्रा होय. वारी ही महाराष्ट्रातील एक धार्मिक व सांस्कृतिक परंपरा आहे. ही वारी आषाढ आणि कार्तिक महिन्यातील शुद्ध एकादशी अशा दोन्ही वेळा होते. एका सिद्धांतानुसार, वारकरी संत ज्ञानेश्वरांचे वडील विठ्ठलपंत यांनी आषाढ आणि कार्तिक या हिंदू महिन्यांत पंढरपूरला जाण्यासाठी वारी सुरू केली . अस्तित्वात असल्याचे मानले जाते. मराठी महिन्यात आषाढ शुक्ल एकादशीमध्ये अशा अनेक दिंड्या महाराष्ट्रातील जवळपास प्रत्येक गाव, शहर आणि शहरातून पंढरपूरला भगवान पांडुरंगाच्या दर्शनासाठी येतात आणि त्यांची भक्ती व्यक्त करतात. पंढरपूर वारीची हि परंपरा खूप जुनी असावी कारण ज्ञानेश्वर महाराज यांचे वडील देखील वारीला जात होते.

# रोहित शर्माच्या जागी कोण?

## » भारताच्या टी-20 संघाचे कर्णधारपद कोण भूषवणार

नवी दिल्ली । वृत्तसंस्था

**भारतीय संघाचा नियमित कर्णधार रोहित शर्माने टी-२० विश्वचषकानंतर टी-२० आंतरराष्ट्रीय फॉरमॅटमधून निवृत्ती जाहीर केली. त्यामुळे भारताच्या टी-२० संघाचे कर्णधारपद कोण भूषवणार यावर सर्वांच्या नजरा आहेत. तर रोहित शर्माचा उत्तराधिकारी म्हणून हार्दिक पंड्याच्या नावाची जोरदार चर्चा आहे. हार्दिकने रोहितच्या अनुपस्थितीत भारतीय संघाचे कर्णधारपद सांभाळले आहे. याशिवाय त्याने आयपीएलमध्ये त्याच्या नेतृत्वाखाली जेतेपद पटकावले आहे. त्यामुळे बीसीसीआय हार्दिकलाच भारताच्या टी-२० संघाचे कर्णधार घोषित करेल असे समजले जात आहे. पण याचदरम्यान आता एका अहवालात समोर आले आहे की बीसीसीआय हार्दिक पंड्याकडे टी-२० संघाचे कर्णधारपद सोपण्यावर साशंक आहे, याचे कारणही समोर आले आहे.**




बीसीसीआय आणि निवड समिती सदस्य सध्या हार्दिक पंड्याला त्याच्या फिटनेसच्या चिंतेमुळे कायमस्वरूपी T20I संघाचा कर्णधार म्हणून नियुक्त करण्यावरून संभ्रमात आहेत. हा निर्णय घेताना दोन गट पडले असून त्यांच्यात या मुद्द्यावर चर्चा सुरू आहे. नुकत्याच पार पडलेल्या T20 विश्वचषकात भारताच्या विजयात पंड्याची महत्त्वाची भूमिका होती. पण त्याच्या आजवरच्या आंतरराष्ट्रीय कारकिर्दीतील त्याच्या गंभीर दुखापतींच्या इतिहासामुळे तो कर्णधार म्हणून संघाची धुरा कितपत सांभाळेल यावर प्रश्नचिन्ह उभारले जात आहे. हार्दिक त्याच्या फिटनेसमुळे तो कसोटी संघाबाहेर आहे. त्याच्या दुखापतींमुळे भारताच्या महत्त्वाच्या मालिकांमधून बाहेर होऊ शकतो आणि याच कारणांमुळे बीसीसीआय कर्णधारपदाची धुरा पूर्णपणे त्याच्यावर सोपवण्यात कचरत आहे. बीसीसीआयच्या एका उच्चपदस्थ सूत्राने इंडियन एक्स्प्रेसला सांगितले की, “हे एक नाजूक प्रकरण आहे. दोन्ही बाजूंकडून या विषयावर चर्चा सुरू आहे आणि त्यामुळे सर्वजण एकमताने निर्णय घेऊ शकत नाहीयत. हार्दिकचा फिटनेस हा एक मुद्दा आहे पण त्याने भारतासाठी आयसीसी ट्रॉफी जिंकण्यात त्याने मोठी भूमिका बजावली आहे.” हार्दिकवरून सुरू असलेल्या या सर्व चर्चादरम्यान सूर्यकुमार यादव हा भारताच्या टी-२० संघाच्या कर्णधारपदासाठी प्रबळ दावेदार म्हणून समोर आला आहे. रोहित शर्मा आणि विराट कोहलीच्या निवृत्तीनंतर टी-२० मध्ये भारताचा नंबर १ फलंदाज असलेल्या यादवने एकदिवसीय विश्वचषकानंतर ऑस्ट्रेलियाविरुद्धच्या घरच्या मालिकेत आपले नेतृत्व कौशल्य दाखवले होते. सूर्यकुमार यादवबद्दल सांगताना सूत्रांनी माहिती देत सांगितले की, “सूर्यकुमार यादवबद्दल बोलायचं तर त्याच्या नेतृत्वाला भारतीय संघाच्या ड्रेसिंग रूममधून चांगला प्रतिसाद मिळाला आहे.” टी-२० कर्णधारपदाचा अंतिम निर्णय नवे मुख्य प्रशिक्षक गौतम गंभीर यांच्याशी विचारविनिमय करून केला जाईल. इंडियन प्रीमियर लीगमध्ये कोलकाता नाइट रायडर्सचे नेतृत्व करताना गंभीरने सूर्यकुमार यादवसोबत काम केले आहे. अजित आगरकर यांच्या नेतृत्वाखालील बीसीसीआय आणि निवड समिती या आठवड्यात गंभीरसोबत पहिली निवड बैठक होणार आहे. या बैठकीनंतर लवकरच श्रीलंकेतील आगामी एकदिवसीय आणि टी-२० मालिकेसाठी संघांची घोषणा केली जाईल.बीसीसीआय आणि निवड समिती सदस्य सध्या हार्दिक पंड्याला त्याच्या फिटनेसच्या चिंतेमुळे कायमस्वरूपी T20I संघाचा कर्णधार म्हणून नियुक्त करण्यावरून संभ्रमात आहेत. हा निर्णय घेताना दोन गट पडले असून त्यांच्यात या मुद्द्यावर चर्चा सुरू आहे.

### एकमताने निर्णय घेऊ शकत नाही

नुकत्याच पार पडलेल्या T20 विश्वचषकात भारताच्या विजयात पंड्याची महत्त्वाची भूमिका होती. पण त्याच्या आजवरच्या आंतरराष्ट्रीय कारकिर्दीतील त्याच्या गंभीर दुखापतींच्या इतिहासामुळे तो कर्णधार म्हणून संघाची धुरा कितपत सांभाळेल यावर प्रश्नचिन्ह उभारले जात आहे. हार्दिक त्याच्या फिटनेसमुळे तो कसोटी संघाबाहेर आहे.HARDIK PANDYA त्याच्या दुखापतींमुळे भारताच्या महत्त्वाच्या मालिकांमधून बाहेर होऊ शकतो आणि याच कारणांमुळे बीसीसीआय कर्णधारपदाची धुरा पूर्णपणे त्याच्यावर सोपवण्यात कचरत आहे. बीसीसीआयच्या एका उच्चपदस्थ सूत्राने इंडियन एक्स्प्रेसला सांगितले की, “हे एक नाजूक प्रकरण आहे. दोन्ही बाजूंकडून या विषयावर चर्चा सुरू आहे आणि त्यामुळे सर्वजण एकमताने निर्णय घेऊ शकत नाहीयत.

# शुबमनच्या नेतृत्त्वावर अमित मिश्राने उपस्थित केले प्रश्न

## » म्हणाला, ‘त्याला कर्णधारपदाबद्दल काहीच माहिती नाही…’

।नवी दिल्ली ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**भारत आणि झिम्बाब्वे यांच्यातील पाच सामन्यांची टी-२० मालिका नुकतीच पार पडली. या मालिकेत भारताच्या यंग ब्रिगेडने शुबमन गिलच्या नेतृत्वाखाली झिम्बाब्वेचा ४-१ धुव्वा उडवला. या मालिकेत शुबमनच्या नेतृत्वाखाली बऱ्याच युवा खेळाडूंनी भारतीय संघात पदार्पण केले. मात्र, शुबमन गिलच्या कर्णधारपदाबाबत भारताचा अनुभवी क्रिकेटपटू अमित मिश्रा धक्कादायक विधान केले आहे. गिलला कर्णधारपदाची कल्पना नाही, असे तो म्हणाला.**



भारताचा अनुभवी क्रिकेटपटू अमित मिश्राने शुभंकर मिश्राच्या पॉडकास्ट शोदरम्यान गिलच्या कर्णधारपदावर आपले मत मांडले. शुबमन गिल आयपीएलमध्ये गुजरात टायटन्स संघाचे नेतृत्व करतो. अमित मिश्रा म्हणाला, ‘शुबमनला मी कर्णधार बनवणार नाही. कारण मी त्याला आयपीएलमध्ये पाहिलं होतं. त्याला नेतृत्व कसे करावे, हे माहित नाही. त्याला कर्णधारपदाची कल्पना नाही.’ गिलच्या नेतृत्वाखाली भारताने झिम्बाब्वेविरुद्धच्या मालिकेची सुरुवात पराभवाने केली असली तरी उर्वरित चार सामने जिंकून भारताने मालिका जिंकली.अमित मिश्रा पुढे म्हणाला, “फक्त तो भारतीय संघाचा भाग आहे म्हणून त्याला कर्णधार बनवू नये. गिलने गेल्या काही हंगामात आयपीएलमध्ये चांगली कामगिरी केली आहे, त्याने भारतीय संघातही चांगली कामगिरी केली आहे. भारतीय संघाने त्याला कर्णधार बनवले कारण त्याला नेतृत्वाचा अनुभव यायला हवा, जो आयपीएलमध्ये गुजरात टायटन्सचे नेतृत्व करताना दिसत नव्हता.”अमित मिश्राने टी-२० फॉरमॅटसाठी इतर संभाव्य कर्णधारांवरही प्रकाश टाकला.

### तो पूर्णपणे तंदुरुस्त आहे

त्याने संजू सॅमसन, ऋषभ पंत आणि ऋतुराज गायकवाड यांना चांगले पर्याय म्हणून वर्णन केले. गायकवाड हा झिम्बाब्वे मालिकेसाठी संघाचा भाग होता, तर सॅमसन दुसऱ्या सामन्यापासूनच संघात सामील झाला होता. अनुभवी लेग स्पिनर म्हणाला, “मी त्याला (शुबमन गिल) आयपीएलमध्ये पाहिले आहे आणि त्याला नेतृत्व कसे करावे हे माहित नाही. त्याला कर्णधारपदाबद्दल काहीच माहिती नाही. त्याला कर्णधार का करण्यात आले? हा प्रश्न आहे. तो फक्त भारतीय संघात आहे याचा अर्थ त्याला कर्णधार बनवायचे नाही.”शुबमन गिलच्या नेतृत्वाखाली भारताने झिम्बाब्वेविरुद्धची मालिका ४-१ अशी जिंकली. अशा परिस्थितीत आगामी श्रीलंका टी-20 मालिकेत संघाचे नेतृत्व कोण करणार हा मोठा प्रश्न आहे. मात्र, बीसीसीआयच्या एका सूत्राने पीटीआयला सांगितले की, ‘हार्दिक पंड्या भारतीय टी-२० संघाचा उपकर्णधार होता. तो पूर्णपणे तंदुरुस्त आहे आणि तीन सामन्यांच्या टी-२० मालिकेसाठीही उपलब्ध आहे. त्यामुळे तो कर्णधार असेल.’